आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१३ जून २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- G-7 शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ईटलीला रवाना / भारत-इटली धोरणात्मक भागीदारी, तसंच भारत-प्रशांत आणि भूमध्यसागरीय प्रदेशांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं प्रतिपादन
- नीट परीक्षेतल्या १ हजार ५६३ विद्यार्थ्यांचे ग्रेस मार्क रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय / त्यांना २३ जूनला पुन्हा परीक्षा देता येणार
- राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारपदी अजित डोवाल, तर प्रधानमंत्र्याच्या प्रधान सचिवपदी पी. के. मिश्रा यांची फेरनियुक्ती
- जागतिक कनिष्ठ बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेचं विजेतपद दिव्या देशमुखनं पटकावलं

  **आणि**
- नागपुरात स्फोटकांच्या कंपनीत झालेल्या स्फोटात ६ जणांचा मृत्यू, कुवेतमधल्या इमारत आग दुर्घटनेत मृत्यू झालेल्या भारतीय कामगारांची संख्या ४५ वर

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी G-7 शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी आज ईटलीला रवाना झाले. भारत-इटली धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी तसंच भारत-प्रशांत आणि भूमध्यसागरीय प्रदेशांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इटलीला जाण्यापूर्वी दिलं. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्या निमंत्रणावरून ते G-7 शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी जात आहेत. यानिमित्तानं इटलीला भेट होत असल्याचा मला आनंद आहे, असंही मोदी म्हणाले. या परिषदेत, कृत्रिम

बुद्धिमत्ता, ऊर्जा, आफ्रिका आणि भूमध्य सागरावर लक्ष केंद्रित केलं जाईल, असंही त्यांनी सांगितलं. भारताच्या अध्यक्षतेखाली झालेल्या G-20 शिखर परिषदेचे परिणाम आणि आगामी G-7 शिखर परिषद यांच्यात अधिक समन्वय आणण्याची आणि दक्षिण विश्वासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या मुद्द्यांवर विचारविनिमय करण्याची ही संधी असेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

<><><><>

नीट परीक्षेतल्या १ हजार ५६३ विद्यार्थ्यांचे ग्रेस मार्क रद्द करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. ग्रेस मार्कशिवाय मिळालेले गुण या विद्यार्थ्यांना कळवले जातील आणि त्यांना २३ जून रोजी पुन्हा परीक्षा देण्याचा पर्याय उपलब्ध करुन देणार असल्याची माहिती केंद्र सरकारनं आज सर्वोच्च न्यायालयात दिली. ज्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यायची नसेल त्यांचे ग्रेस मार्कांशिवाय मिळालेले गुण ग्राह्य धरले जातील. २३ जून रोजी होणाऱ्या परीक्षेचा निकाल ३० जून रोजी जाहीर केला जाईल, असंही सरकारनं आज सांगितलं.

<><><><>

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून अजित डोवाल, तर प्रधानमं्त्र्याचे प्रधान सचिव म्हणून निवृत्त प्रशासकीय अधिकारी डॉक्टर पी. के. मिश्रा यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं आज या नियुक्त्यांना मंजुरी दिली. डोवाल आणि मिश्रा यांच्या नियुक्तीचा कालावधी पुढच्या आदेशापर्यंत किंवा प्रधानमंत्र्यांचा कार्यकाळ संपेपर्यंत राहील, असं केंद्रीय आस्थापना मंत्रालयानं कळवलं आहे.

<><><><>

राजनाथ सिंह यांनी संरक्षण मंत्रीपदाचा तर के. राममोहन नायडू यांनी नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचा कार्यभार आज हाती घेतला. पुढल्या पाच वर्षात संरक्षण

सामुग्रीची निर्यात ५० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचं देशाचं उद्दिष्ट असल्याचं राजनाथ सिंह यावेळी म्हणाले. सरकारला आत्मनिर्भर भारताची निर्मिती करायची आहे. तसंच देशाची सुरक्षा आणि सुरक्षा दलाचं कल्याण याला सरकारचं प्राधान्य आहे, असंही ते म्हणाले.

तर प्रवाशांना परवडणारी विमान सेवा उपलब्ध करून देण्याचं आपलं उद्दिष्ट असल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी सांगितलं.

<><><><><>

इस्रायलचे परराष्ट्रमंत्री इस्रायल काट्झ यांनी परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांच्याशी आज दूरध्वनीवरून संवाद साधला. भारत-इस्रायल सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी उभय देशांचं एकमत असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहारमंत्री एस. जयशंकर यांनी आज आपल्या समाजमाध्यमांवरील संदेशात केलं आहे.

<><><><><>

राज्यसभा निवडणुकीसाठी बिनविरोध निवडून येण्याचा राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार यांचा मार्ग मोकळा झाला आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत त्यांच्याशिवाय इतर कुणीही अर्ज भरलेला नाही. उद्या अर्जाची छाननी होईल, त्यानंतर त्यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा होऊ शकते.

प्रफुल्ल पटेल यांनी कालावधी पूर्ण होण्याआधीच राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिल्यानं ही निवडणूक होते आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत बुधवारी रात्री त्यांच्या नावावर सहमती झाली, त्यांच्या उमेदवारीवरुन कुणीही नाराज नाही, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली.

दरम्यान, मुंबई शिक्षक मतदारसंघातून शिवसेनेने शिवाजी शेंडगे यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

**<><><><><>**

देशात भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम १ जुलैपासून लागू केले जाणार आहेत. नव्या कायद्यांबाबत जाणून घेण्यासाठी “NCRB Sankalan of Criminal Laws” हे मोबाईल ॲप, गुगल प्लेस्टोअरवर आणि ॲपल ॲप स्टोअरवर उपलब्ध आहे. सामान्य नागरिक, न्यायालयातले अधिकारी, वकील, कायद्याचे विद्यार्थी, तसंच पोलीस अधिकाऱ्यांना नव्या कायद्यांबाबत आपलं ज्ञान वाढवण्यासाठी हे ॲप मार्गदर्शक म्हणून उपयुक्त आहे.

**<><><><><>**

जागतिक कनिष्ठ बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेचं विजेतेपद दिव्या देशमुखनं पटकावलं आहे. ही स्पर्धा जिंकणारी ती चौथी भारतीय महिला ठरली आहे. ११ पैकी १० गुण मिळवून तिनं हे विजेतेपदक पटकावलं.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या आकर्षी कश्यपनं  महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला आहे. सिडनी इथं झालेल्या १६व्या फेरीच्या सामन्यात आकर्षीनं ऑस्ट्रेलियाच्या काई क्यूई तेओहचा २१-१६, २१-१३ असा सरळ सेट्स मध्ये पराभव केला.

पुरुष एकेरीत एच. एस. प्रणोय आणि समीर वर्मा यांनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला आहे. प्रणोयने इस्रायलच्या मिशा जिल्बेरमनला २१-१७, २१-१५ असं, तर समीर वर्माने सिंगापोरच्या लोह कीन यू याला २१-१४, १४-२१, २१-१९ असं पराभूत केलं. प्रणोयचा पुढचा सामना जपानच्या कोडाई नरोआका याच्याशी तर समीरचा सामना चीनच्या चुन यी लीन याच्याशी उद्या होणार आहे.

मिश्र दुहेरी प्रकारात भारताच्या बी. सुमित रेड्डी आणि एन सिक्की रेड्डी यांच्या जोडीनं ऑस्ट्रेलियन जोडीवर विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

मालविका बनसोड आणि अनुपमा उपाध्याय यांना मात्र इंडोनेशियाच्या खेळाडूंकडून पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरी स्पर्धेत भारताच्या किरण जॉर्जचा जपानच्या केंटा निशिमोटोनं २२-२० , २१-६ असा पराभव केला.

<><><><><>

नागपुरात धामणी परिसरात स्फोटकांच्या कंपनीत झालेल्या स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला असून ३ जण जखमी झाले आहेत. चामुंडा एक्स्प्लोझिव्ह कंपनीत दुपारी ही दुर्घटना घडली. पोलीस आणि स्थानिक बचाव पथक याठिकाणी मदत कार्य करत आहे. मृतांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत देण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

कुवेतच्या मानगाफ परिसरातल्या इमारतीला काल लागलेल्या आगीत ४५ भारतीय कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये केरळच्या २४ कामगारांचा समावेश आहे. या अपघातातल्या मृतांच्या नातेवाईकांना ५ लाख रुपये तसंच जखमींना एक लाख रुपये देण्य़ाची घोषणा केरळ सरकारनं आज केली आहे.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंग यांनी कुवेत चे उपप्रधानमंत्री शेख फहाद युसूफ सौद अल सबाह यांची आज भेट घेतली. कुवेतच्या उपप्रधानमंत्र्यांनी कुवेतच्या आमिर यांच्यावतीनं कुवेतच्या मानगाफ परिसरात आग लागून झालेल्या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आणि या बाबतीत आवश्यक ती सर्व मदत करण्याच्या सूचना दिल्या.

<><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससीची  नागरी सेवा पूर्व परीक्षा - २०२४ येत्या  १६ जूनला होणार आहे.मुंबई शहर जिल्ह्यात एकूण ३६ परीक्षा केंद्रावर ही परीक्षा घेण्यात येणार असून यासाठी एकूण १४ हजार ५०९ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी आंतरवली सराटी इथं सुरू असलेलं आपलं उपोषण स्थगित केलं आहे. मंत्री शंभुराज देसाई, संदिपान भुमरे यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचं आश्वासन दिलं आहे.

<><><><><>

सुपरमॅक्स कंपनीच्या कामगारांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातल्या निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन केलं. यावेळी कामगारांच्या मागण्या ऐकून घेत त्यावर सकारात्मक निर्णय घेऊ असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

//<><><><><>//